# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक २३.०५.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) तहसिल पोलीसांची कामगिरी :— हद्पार ईसमास घातक शस्त्रासह अटक.**

दिनांक २२.०५.२०२६ चे १९.५३ वा. ते २०.५० वा. चे दरम्यान, तहसिल पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, यंग मुस्लीम फुटबॉल मैदान जवळ एक हद्पार ईसम घातक शस्त्रासह फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सोहेल उर्फ कुत्ताखाऊ वल्द मोईनुद्दीन अन्सारी, वय २६ वर्षे, रा. डोबी नगर, अन्सार नगर, जाफर किराणा स्टोअर्स जवळ, तहसिल, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत एक लोखंडी धारदार चाकु किंमती ३००/—रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीला पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेश क्र. ०८/२०२६, दिनांक १६.०२.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे तहसिल येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का., सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहराचे मा. अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) श्री राजेंद्र दाभाडे, मा. पोलीय उपआयुक्त (परि.क्र. ३) श्री. राहुल मदने, मा. सहायक पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) श्रीमती अनिता मोरे यांचे मार्गदर्शनात वपोनि. संजय मेंढे, सपोनि. सुशांत भगत, पोहवा. विनोद गवई, रामकैलास यादव, पोअं. पकंज बागडे, राशीद शेख व पंकज निकम यांनी केली आहे.

**२) बेलतरोडी पोलीस व नागरीकांच्या सहभागाने संयुक्तरित्या रात्रगस्त मोहीम राबवुन, घरफोडी व चोरीचे गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्याचा अनोखा प्रयत्न :—**

उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये शाळा, महाविद्यालये तसेच, काही शासकीय व खाजगी कार्यालयांना सुट्या असतात. त्यामुळे अनेक कुटंबातील सदस्य आपल्या मुलाबाळांसह पर्यटन, नातेवाईकांचे भेटी, विवाह समारंभ व ईतर कार्यक्रमासाठी बाहेरगांवी जात असतात. तेव्हा मोठ्या प्रमाणात घरे बंद राहतात. घरफोडी व चोरी करणारे गुन्हेगार सक्रीय होवुन अशा परिस्थीतीचा फायदा घेवुन, घरफोडी व चोरीच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

घरफोडी व चोरीच्या घटनांना प्रतीबंध घालण्याच्या उद्देशाने, मा. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शनात बेलतरोडी पोलीसांमार्फतीने विशेष रात्रगस्त मोहीम राबविण्यात येत आहे. ज्यामध्ये संपुर्ण पोलीस ठाणेतील

पोलीस अधिकारी, अंमलदार तथा कार्यालयीन कर्मचारी यांना आळीपाळीने रात्रगस्त नेमुन दिली जात आहे. त्यांचे सोबत, ''कम्युनिटी पोलीसींग'' (Community Policing) संकल्पनेअंतर्गत, परीसरातील सुजाण नागरीक, तरूण मंडळी तथा पोलीस मित्र यांचा सक्रीय सहभाग घेवुन, संयुक्तरित्या संवेदनशिल भागांमध्ये पेट्रोलींग करण्यात येत आहे. नमुद संकल्पनेतुन नागरीकांचे सहभागाने सातत्यपुर्ण रात्रगस्तीमुळे परिसरातीत संशयीत हालचालींवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात येत असुन, घरफोडी व चोरी यांसारख्या गुन्ह्यांमध्ये घट निर्माण झाल्याचे निदर्शनास येत आहे.

मा. वरीष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनात, बेलतरोडी पोलीसांचे मार्फतीने पोलीस व नागरीकांच्या सहभागातुन संयुक्तीकरित्या घरफोडी व चोरी यांसारख्या गुन्हेगारींवर प्रभावी नियंत्रण निर्माण करण्याचा हा अनोखा प्रयत्न करण्यात येत आहे.





**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे सदर :—घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २२.०५.२०२६ चे १६.४० वा. ते १७.१० वा. चे दरम्यान, सदर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, एक ईसम ज्याने अंगात गडद लाल रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातला असून, तो प्राणघातक शस्त्र घेऊन डी.आर. एम. ऑफीसमागील रेल्वे पटरीजवळ फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव आयुष सतिष माडबोईनवार, वय २३ वर्षे, रा. मोहन नगर, खलाशी लाईन, गोंड मोहल्ला, सदर, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी धारदार चाकु किंमती २००/—रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा. आशिष बहाळ यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे धंतोली :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २२.०५.२०२६ चे ००.०१ वा. ते ०१.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी कु. ईशानी अजित पांडे, वय २२ वर्षे व त्यांचा भाऊ नामे रेहान अजित पांडे, वय २० वर्ष, दोघेही रा. विजय सहनिवास, वेस्ट अॅव्हेन्यु, धंतोली, नागपूर असे दोघे त्यांची इलेक्ट्रीक मोपेड क्र. एमएच ३१ जीसी ५०८२ ने पोलीस ठाणे धंतोली हद्दीतील लोकमत चौक येथून जात असतांना, एका चारचाकी गाडी क्र. एमएच ३१ जीडी ०१५९ चा चालक नामे प्रज्वल विनोद गजघाटे, वय २७ वर्ष, रा. पवनपुत्र नगर, उमरेड रोड, दिघोरी, नागपूर याने त्याचे

ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मोपेडला धडक दिल्याने दोघेही खाली पडुन गंभीर जखमी झाले. जखमींचा उपचार न्युरॉन हॉस्पीटल येथे करण्यात आला आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे पोउपनि. ज्ञानेश्वर शिरोडे ७०८३८८९००१ यांनी आरोपी चारचाकी चालकाविरूध्द कलम २८१, १२५(ब) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे सक्करदरा</u> :—** दिनांक २२.०५.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत ओमनगर, प्लॉट क्र. ४०६, सचिन बोरकर यांचे घरासमोर एक अनोळखी ईसम वय अंदाजे ४० वर्षे, रंग—सावळा, चेहरा—लांबट, केस काळे, दाढी काळी, अंगात पर्पल रंगाचा चौकडीचा फुलबाहीचा शर्ट व काळ्या रंगाचा थ्री फोर्थ लोअर पॅन्ट घातलेले तसेच, डावे हातावर प्रदीप गुप्ता असे नाव गोंदलेले अशा वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळून आले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी सचिन नामदेवराव बोरकर, वय ५० वर्ष, रा. ओमनगर, प्लॉट क्र. ४०६, सक्करदरा, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे मपोउपनि. गाठे ७८७५६९३०७७ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे अंबाझरी</u> :—** सौ. फुलवती सुनिल गिरी, वय ३७ वर्षे रा. मंडई, पोलीस ठाणे बटका, जि. छिंदवाडा (मध्यप्रदेश), ह.मु.— मेडीकल चौक, नवीन मॉल जवळ, नागपूर हया दिनांक १८.०५.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>**— रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची—५ फुट २ इंच, केस—काळे व लांब, डोळे—काळे, अंगात—पिवळ्या, लाल व मेहंदी रंगाचे ठिपक्यांची साडी व काळा ब्लाऊज घातलेले आहे. भाषा— हिंदी/छत्तीसगढी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे जरीपटका</u> :—** कु. साक्षी राकेश मेश्राम, वय १८ वर्षे, रा. पोल क्र. एसी/८१, रॉय क्लिनीक जवळ, बाराखोली, जरीपटका, नागपूर ही दिनांक २३.०५.२०२६ चे ०२.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता, मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>**— रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट १ इंच, केस—काळे व लांब, अंगात—निळ्या रंगाचा कुर्ती व निळी लॅगीन घातलेली आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते. ओळखचिन्ह—गळ्यात रंगीत धाग्यात रुद्राक्ष घातलेले आहे.


फुलवती


साक्षी

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**